नि.दि.दा. क्रमांक १६/२०१४
सरस्वता / रविंद्र व ईतर
नि.५२ पुढे

**उलटतपास प्रतिवादी क.३ ते ६ तर्फे श्री थोटे वकिल**

माझे वडिल १० वर्षापुर्वी २००७ मध्ये मरण पावले. वादग्रस्त शेतीवरून माझे नाव कमी केल्याचे मला २००७ मध्ये समजले. माझे भाउ सदाशिव २000 मध्ये मरण पावले. हे म्हणने खरे आहे की, माझे वडिल जिवंत असतांना त्यांच्याकडे माझे येणे जाणे होते. हे म्हणने खरे आहे की, माझया वडिलाच्या नावे एका गटमध्ये साडे आठ एकर व दुस-या गटमध्ये अकरा एकर शेती होती. हे म्हणने खरे आहे की, एका शेताचा गट क्र. १३ होता व दुस-याचा गट क्र.३१ होता. या केसमध्ये किती रूपयाचे स्टॅम्प जोडले हे मला माहीत नाही. शपथपत्र नि.५२ मध्ये काय लिहीले हे मला माहीत नाही.

प्रश्न:- शपथपत्रातील माहीती कोणी सांगीतली?

उत्तर:-शपथपत्रातील मजकुर माझया भास्याने सांगीतली.

माझया भाच्याचे नाव संजु चोरे आहे. हे म्हणने खरे नाही की, दावा दाखल केल्यापासून संजु चोरे हा माझयासोबत केसमध्ये येतो. संजु चोरे हा माझया नणंदेचा मुलगा आहे.

२. माझे वय ७२ वर्षे आहे. हे म्हणने खरे आहे की, लग्नांच्यावेळी माझे वय १८ वर्षे होते. माझा जन्म १९४५ पुर्वीचा आहे. हे म्हणने खरे आहे की, माझे वडिल जिवंत असतांना तेच शेतजमीनीची वाहीजुपी करीत होते. हे म्हणने खरे नाही की, माझा भाउ सदाशिव शेती वहीती करत नव्हता. हे म्हणने खरे नाही की, सदाशिव मजुरीचे काम करीत होता.

नि.दि.दा. क्रमांक १६/२०१४
सरस्वता / रविंद्र व ईतर
नि.५२ पुढे

प्रश्नः- दि.२८.४.१९८१ ला मेंढेगाव येथील शेती गट dz-89@1 सदाशिवने कांचनकुमारी यांच्याकडुन विकत घेतला होता ?

उत्तरः- त्यांनी विकत घेतला असेल याबद्दल मला माहीती नाही.

मला हे माहीत नाही की, सदाशिव याने पुन्हा मेंढेगाव येथील गट क्र.८४ ही विकत घेतली होती. हे म्हणने खरे नाही की, माझे वडिल मयत झाल्यानंतर गट क्र.१३ व ३१ वर त्यांच्या वारसानची नावे दर्ज झाली. हे म्हणने खरे आहे की, सोसायटीचे कर्ज फेडण्यासाठी आम्ही सर्वांनी मिळून २ एकर शेती विकली होती. हे म्हणने खरे आहे की, २००७ मध्ये माझी प्रकृती ठिक नव्हती. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी मी माझया भाच्यांना व वहीनींना उपचाराकरीता पैसे मागीतले होते. हे म्हणने खरे आहे की, वडिल व भाउ मयत झाल्यानंतर मी दिवाळीला भाच्यांकडे जात होते. पण आता मी त्यांच्याकडे जात नाही. हे म्हणने खरे नाही की, मी माझया भाच्यांकडे एक लाख रूपये मागीतले होते. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी माझया भांच्यांनी व वहीनींनी आमच्याकडे पैसे नाहीत असे त्यांनी सांगीतले होते. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी मी माझया भाच्याला गट क्र.१३ मध्ये २ एकर शेती विकून मला एक लाख रूपये दया. हे म्हणने खरे आहे की, मी त्याचवेळी माझया भाच्यांनी शेती विकण्याची परवानगी देवून रेकॉर्ड दुरूस्त करण्यास सांगीतले होते. हे म्हणने खरे नाही की, त्याचवेळी मी मला शेती पाहीजे नाही असे म्हटले होते. हे म्हणने खरे नाही की, शेती पाहीजे नाही म्हणून हक्क सोडण्याचा दस्त लिहून दिला होता. हे म्हणने खरे आहे की, मी २ एकराची रजिस्ट्री करून दिली होती.

नि.दि.दा. क्रमांक १६/२०१४
सरस्वता / रविंद्र व ईतर
नि.५२ पुढे

३. २००७ मध्ये मी कोण कोणत्या कागदावर अंगठे केले होते हे मला माहीत नाही. ३.८१ पैकी १.४१ हे.आर. शेती सुनील ठाकरे याला १,७०,०००/- ला विकली होती. हे म्हणने खरे नाही की, त्यातील एक लाख मी ठेवून घेतले. हे म्हणने खरे नाही की, विक्रीपत्र व हक्कसोडपत्र करते वेळी रजिस्ट्रार साहेबाने आमचे फोटो घेतले होते. हे म्हणने खरे नाही की, विक्रीपत्रावर व हक्कसोडपत्रावर मी वाचून समजून मी त्यावर अंगठा केला होता. हक्कसोडपत्र केल्यानंतर माझया भाच्याने फेरफार करून घेतला होता किंवा नाही हे मला माहीत नाही.

४. पोवारी व मेंढेगाव येथील शेतजमीनी सरकार संपादित करून घेतात किंवा नाही याबाबत मला माहीत नाही. हे म्हणने खरे नाही की, सरकार मोबदला देत असल्यामुळे पैश्याच्या लोभापोटी मी कोर्टात खोटी केस दाखल केली. हे म्हणने खरे नाही की, २००७ मध्ये मी स्वईच्छेने भाच्यासोबत चांगले संबंध राहावे म्हणून माझा हिस्याचा हक्कसोडपत्र करून दिले.

**उलटतपास प्रतिवादी क.७ तर्फे श्री नाकाडे वकिल**

५. माझया वडिलाकडे एकुण ४० एकर शेतजमीन होती. त्यापैकी माझया वडिलाने ११ एकर शेतजमीन विकली. मी २ एकर शेतजमीन विकली. २०१३ मध्ये माझया भाच्याने शेतजमीन विकली किंवा नाही याबाबत मला माहीती नाही. हे म्हणने खरे नाही की, मी खोटया केसवरून खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास - नाही
वा.दा.ब.आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

( डि.बी. गुट्टे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही.

दिनांक १०/१०/२०१७